# प्रेस नोट

दिनांक १०/०६/२०२१

| | |
|---|---|
| युनिट | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १. श्री.हरीष सुभाषराव काळे, वय–३१ वर्ष, व्यवसाय–नोकरी, पद–अव्वल कारकून, वर्ग ३, अन्न व नागरी पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती.<br>२. श्री.अजय नरेंद्र मुळे, वय–३८ वर्ष, व्यवसाय–खाजगी काम, रा. अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३६००/–रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५००/–रु. तडजोडीअंती स्विकारली. |
| घटनास्थळ | पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि.१०/०६/२०२१ चे १४:०५ वा. |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदाराचे आईचे नावाने सरकारी स्वस्त धान्याचे दुकान असून भारत सरकारतर्फे पंतप्रधान गरीब कल्याण योजनेंतर्गत तक्रारदार यांचे स्वस्त धान्य दुकानामार्फत जुन २०२० ते सप्टें २०२० अशा चार महिन्याचे धान्य बी.पी.एल. व अंत्योदय रेशनकार्ड धारकांना वाटप केल्याने त्यांना चार महिन्याचे कमीशन म्हणून शासनाकडून देण्यात येणारे ३६०००/–रु. अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत त्यांच्या आईच्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. अन्न व नागरी पुरवठा विभागातील अव्वल कारकून श्री. हरीष काळे यांनी तक्रारदारास जमा झालेल्या ३६०००/–रुपयाचे १० टक्के प्रमाणे ३६००/–रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो येथे दिली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.१०/०६/२०२१ रोजीचे पडताळणीमध्ये श्री.काळे यांनी तक्रारदारास चार महिन्याचे धान्य बी.पी.एल. व अंत्योदय रेशनकार्ड धारकांना वाटप केल्याने त्यांच्या आईच्या खात्यावर जमा झालेल्या पैशाच्या मोबदल्यात तडजोडीअंती २५००/–रु. लाचेची मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान आलोसे हरीष काळे यांनी खाजगी इसम अजय मुळे यांचे मार्फतीने तक्रारदाराकडून २५००/–रु. लाच रक्कम पचासमक्ष स्विकारल्याने लोकसेवक श्री.हरीष काळे व खाजगी इसम श्री.अजय मुळे यांना ताब्यात घेण्यात आले असून दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.विशाल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक श्री.अरुण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष वि.इंगळे, पोलीस नाईक प्रमोद धानोरकर, पोलीस शिपाई राजेश कोचे तसेच चालक सपोउपनि.सतिष किटुकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :– ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

पोलीस उप अधिक्षक ॲन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

( संतोष वि.इंगळे )
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

OPPO F9 Pro · ©clicked by santosh

Scanned with CamScanner